नि. फौ. ख. क्र. ८४/२०२०
सरकार विरुध्द सतीश डुमणे
निशाणी क्र.३७ लगत

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.बिलोलीकर यांच्या मार्फत साक्षीदार क्र.१ अमृत डुमणेचा शपथेवरील उलटतपास सुरु</u>**

३. हे खरे की, आरोपी माझ्या भावकीतील आहेत. वादग्रस्त शेत गट क्रमांक ८२ मौजे सायखेड याचा पुर्वीचा सर्वे क्रमांक काय होता, हे मला माहिती नाही. हे खरे आहे की, गट क्र.८२ मधील शेतजमीन ही गायरान शेतजमीन आहे. ती शेतजमीन २१ हेक्टर आहे. शकुंतला बाई माझी आई असुन पद्मीनबाई व कलावतीबाई हया माझ्या आत्या आहेत. हे खरे आहे की, आरोपी देविदास याने माझ्या आई आणि आत्याविरुद्ध बिलोली कोर्टात सदर शेताबाबत नियमित दिवाणी दावा क्रमांक २२७/२०२२ दाखल केली आहे. हे खरे आहे की, त्या दाव्यामध्ये तहसिलदार, जिल्हाधिकारी व तलाठी हे सर्व प्रतिवादी आहेत. हे खरे नाही की, गट क्रमांक ८२ मध्ये वाटणी मिळावी म्हणुन देविदास जळबा डुमणे, आंबुबाई पोशट्टी खंदारे, सुंदरबाई फकीरा सवई, पांडुरंग जळबा डुमणे, ललीताबाई भाऊराव खंदारे व भारतबाई बाबु वाघमारे यांनी त्याच दाव्यामध्ये मागणी केली आहे. हे खरे आहे की, उपरोक्त नावाचे सर्व व्यक्ती हे मयत जळबा संभा डुमणे याचे वारस आहेत. हे खरे नाही की, सदर जमीन ही जळबाच्या नावाने असुन आरोपींच्या ताब्यात आहे. हे खरे नाही की, सदर जमीन हयातीपर्यंत जळबा याच्या ताब्यात होती व त्याच्या मृत्यपश्चात आरोपींच्या ताब्यात आली. जळबा यांचा मृत्यु अंदाजे ३५ वर्षापुर्वी झाला. हे खरे आहे की, ही जमीन शासनाची असुन वहितीसाठी आमच्या पुर्वजाना देण्यात आली होती. हे खरे नाही की, ही जमीन केवळ जळबा डुमणे यालाच वहिति करण्यासाठी देण्यात आली होती. सदर जमीनीचा वाद हा माझ्या जन्मापुर्वीपासुन अंदाजे ४० वर्षापासुन सुरु आहे. सदर जमीनीचा वाद सुरु असल्याची माहिती माझ्या वडीलांकडुन मला मिळाली. हे खरे आहे की, पुर्वेला खंडेराव कुलकर्णी यांची जमीन, पश्चीमेला विठ्ठल केरबा यांची जमीन, उत्तरेला जकोजी रामोड यांची जमीन व दक्षिणेला पोतन्ना नारायण

याची जमीन आहे. हे खरे नाही की, उपरोक्त चतुर्सिमेतील शेत हे सर्व आरोपी करुन खातात. हे खरे नाही की, मला जेंव्हापासुन कळते तेंव्हापासुन वादग्रस्त शेत हे आरोपींच्या ताब्यात आहे. दिनांक ३१/०७/२०२० रोजी वरील शेतामध्ये कोणतेही पिक नव्हते. हे खरे नाही की, आरोपींचे आणि आमचे शेताच्या कारणावरुन भांडण झाले. साक्षीदार सांगतो की, गाय बांधण्याच्या कारणावरुन भांडण झाले. हे खरे नाही की, ज्या ठिकाणी मी गाय बांधुन ठेवतो, ती वादग्रस्त जमीनींपैकी आहे. हे खरे आहे की, माझ्या पत्नीचा हात मुरगळताना मी पाहिलेला नाही. हे खरे नाही की, माझ्या समक्ष गाय बांधण्याच्या कारणावरुन कोणतीही घटना घडली नाही. हे खरे नाही की, शेतीच्या कारणावरुन माझ्या समक्ष कोणतीही घटना घडली नसुन देखील केवळ आरोपींना फसवण्यासाठी त्यांनी लाकडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली, हातमुरगाळला हे खोटे सांगत आहे. हे खरे आहे की, आरोपी सतिशने माझ्याविरुद्ध देखील मारहाणीची केस दाखल केली होती, ती याच न्यायालयात प्रलंबित आहे. हे खरे नाही की, आरोपी सतिशने फौजदारी कार्यवाही केली म्हणुन त्याला शह देण्यासाठी ही खोटी कार्यवाही केली आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, पोलीस कार्यवाही केल्याने आरोपींनी शेतजमीनीचा ताबा सोडुन आम्हाला दयावा याकरिता खोटी केस केली आहे.

## निशाणी क्र.४२ वरील आदेशान्वये फेरतपास सरकारी विधीज्ञ श्री. शिखरे यांच्यामार्फत सुरु

**४.** ज्या काठीने मला मारहाण झाली ती काठी दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता साक्षीदाराला गुन्हयातील जप्त लाकडी दांडा अंदाजे लांबी पाऊणे दोन फुट दाखविण्यात आला. याच काठीने मला मारहाण झाली. सदर **लाकडी काठीस वस्तु निशाणी–अ** देण्यात येत आहे.

## आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.बिलोलीकर यांच्या मार्फत साक्षीदाराचा शपथेवरील उलटतपास सुरु

**५** हे खरे नाही की, पोलीसांनी वर्णन केल्याप्रमाणे वस्तु निशाणी अ वरील काठी नाही. हे खरे आहे की, ही काठी वरच्या बाजुला गोल आहे. हे खरे आहे की, सदर

काठी एक सारख्या गोलाईची नाही. हे खरे नाही की, हि काठी पोलीसांनी दिनांक ०६/०८/२०२० रोजी पोलीस ठाणे धर्माबाद येथे मला बोलावुन माझ्या समक्ष जप्त केली. हे खरे नाही की, सदर काठी आरोपींकडुन जप्त केलेली नाही व याने मारहाण झालेली नाही.

**फेरतपास–पुर्ण**

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,

Sd/–

(एस.ए.हरणे)

दिनांक: ०९.०९.२०२४

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.